# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक**

क्रमांक:२/एनजीसी/माहितीसंग्रह/२०१४/११७८-अ
दिनांक : 15 SEP 2014

प्रति,
प्राचार्य / संचालक,
शासकीय , अनुदानित व विनाअनुदानित,
अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र,
हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी, वास्तुशास्त्र
पदवी व पदव्युत्तर पदवी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

विषय : संस्थेबाबतची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत.

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व संस्था प्रमुखांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस भेट देणा-या विविध समित्यांना तपासणीकरीता काही आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रे यांची आवश्यकता असते. राज्यातील संस्थांची संख्या विचारात घेता, सर्व संस्थांची कागदपत्रे अद्ययावत करणे व आवश्यकतेनुसार शोधुन काढणे कठीण होत आहे. तसेच संस्थांनाही अशा प्रकारची कागदपत्रांच्या प्रती वेळोवेळी सादर कराव्या लागतात. यामुळे स्टेशनरी व वेळ दोन्हींचा अपव्यय होतो. याकरीता पर्यायी व्यवस्था म्हणुन संस्थेशी संबंधीत सर्व कागदपत्रांच्या सॉफ्ट कॉपी संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याचे संचालनालयाने ठरविले आहे. अशा प्रकारचा बदल करण्याकरीता सर्व संस्थांची एकवेळ माहिती (One Time Information) संकलित करणे आवश्यक असुन, यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

२. राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांनी सर्व कागदपत्रे त्यांचे प्राचार्यांनी साक्षांकीत करुन खालील क्रमाने स्कॅन करुन खालीलप्रमाणे नाव द्यावे.

| | |
|---|---|
| १. संस्थेचे नोंदणी पत्र | xxxx_Trust Registration |
| २. प्रथम मान्यतेचे पत्र | xxxx_First Approcval.pdf |
| ३. अ.भा.तं.शि.प. चे प्रथम मान्यता पत्र | xxxx_AICTE Approcval.pdf |
| ४. राज्य शासनाचे मान्यता पत्र | xxxx_State Approcval GR.pdf |
| ५. विद्यापीठ/ मंडळ यांचे संलग्नीकरण पत्र | xxxx_Affiliation Letter |
| ६. मान्यता पुढे चालु ठेवण्याचे पत्र | xxxx_Extension Approcval |
| ६. संचालनालयाकडे अभ्यासक्रमनिहाय असलेल्या मुदतठेव पावती | xxxx_F.D. Deposite Receipt |
| ७. जमिनीसंदर्भात कागदपत्रे | xxxx_Land Documenrt 7/12 |


सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक 7253
दिनांक 16 SEP 2014

| | |
|---|---|
| ८. भोगवटा प्रमाणपत्र | xxxx_Occupancy Certificate |
| ९. इमारत संदर्भात कागदपत्रे | xxxx_Building Documents |
| १०.प्रयोगशाळा / कार्यशाळा/ ग्रंथालय इ. | xxxx_Laboratory Documents |
| ११.संस्थेतील सर्व कर्मचा-यांची प्राचार्यांनी प्रमाणीत केलेली यादी | xxxx_List fo Emplouyees with joining date (dd/mm/yyyy) |
| १२.संस्थेच्या अभ्यासक्रमासाठीचे शुल्क | xxxx_Shikshanshulk |

"xxxx_"संस्थेचा डि.टी.ई. संकेतांक(DTE Code)

वरील प्रमाणे कागदपत्रे एका संस्थेकरीता एक डि.व्हि.डी याप्रमाणे स्कॅन करुन ठेवावीत. संस्थेच्या एखाद्या पत्राचे एकापेक्षा जास्त संदर्भ असल्यास स्कॅन फाईलच्या नावानंतर "'--1" , "--2" अशाप्रकारे नाव देण्यात यावे.

३. सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती व सॉफ्ट कॉपी संबंधित विभागीय कार्यालयामध्ये गुणवत्तायादी तपासण्याचे वेळापत्रकानुसार सादर करण्यात याव्यात.

४. साक्षांकीत प्रती सादर केल्यानंतर कागदपत्रांमध्ये बदल करता येणार नाही, तथापि, नंतर प्राप्त होणारी कागदपत्रे "Add" करता येतील.

५. सर्व कागदपत्रे संस्था, तपासणी समिती, विभागीय कार्यालय, संचालनालय, शासन यांना आवश्यकतेनुसार उपलब्ध असतील.

६. सर्व कागदपत्रे A4 आकाराची असावीत, किंवा त्या आकारात स्कॅन करण्यात यावीत.

७. वरील सर्व माहिती ०२ DVD(Read/write) मध्ये विभागीय कार्यालयामध्ये सादर करण्यात यावी त्यापैकी एक DVD ही विभागीय कार्यालयाकरीता व दुसरी DVD संचालनालयाकरीता असेल.

वरील सर्व कागदपत्रे व माहिती आपल्या स्तरावर तयार ठेवुन, प्रत्येक विभागीय कार्यालयामार्फत संस्थानिहाय गुणवत्ता यादी तपासणीच्या वेळापत्रकानुसार विभागीय कार्यालयात सादर करण्यात यावी. सदर माहिती अत्यंत महत्वाची असल्याने अचुक असेल याची सर्व संस्थाप्रमुखांनी खात्री करावी व उपरोक्त सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपुर यांना कळविण्यात येते की, आपल्या विभागातील सर्व संस्थांची उपरोक्त माहिती सदर संस्थेच्या गुणवत्ता यादी तपासणीवेळी संकलित करण्यात यावी. पुढील निर्देश स्वतंत्रपणे देण्यात येतील.

---

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर**
**क्र. तशिसं/प्राकाना/शैवि–३/[redacted]/२०१४/** 3009
**दिनांक :** 19 SEP 2014

**प्रति,**
**प्राचार्य,**
**सर्व शासकीय, अनुदानित विना अनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, एचएमसीटी, वास्तुशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी महाविद्यालये**
**नागपूर विभाग, नागपूर.**

**यांना कळविण्यांत येते की, पत्रामध्ये नमूद केलेली संस्थेबाबतची माहिती गुणवत्ता यादी तपासणीच्या वेळापत्रकानुसार या कार्यालयात त्वरीत उपलब्ध देण्यांत यावी.**

**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,**
**नागपूर.**